**महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 चे कलम 44 व जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी नियम 1969**

**अनुसूची पाच (नियम 7) नियोजित अधिका-यांचा अधिकारीतेत असलेल्या जमिनीच्या धारकाला द्यावयाची सनद**

---

**वाचले :-** मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडील आदेश क्र.मशा/कक्ष/3/2/कावि/608/2021 दि.07/09/2021

---

**तहसिल कार्यालय नाशिक**
क्र.आसथा-1/42-क/एस.आर./34/2021
नाशिक दि. 24/12/2021

ज्याअर्थी **नाशिक** जिल्हयाच्या **नाशिक** तालुक्यातील **एकलहरे** गांवातील **ग.ट.नं.70 क्षेत्र 44200.00 चौ.मी. पैकी 16575.00 चौ.मी** चे वरिष्ट धारक /भोगवटदार /कुळ(ज्याचा यापुढे अर्जदार असा उल्लेख करण्यात आला आहे आणि संदर्भानुसार अनुज्ञेय असलेल्या त्या संज्ञेत त्यांचे वारस, मृत्युपत्र व्यवस्थापक,कारभारी आणि अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) असलेले **एकलहरे येथील** रहिवाशी **मातोश्री एज्युकेशन सोसायटी तर्फे अध्यक्ष श्री. किशोर भिकाजी दराडे मु.पो. एकलहरे,ता.जि.नाशिक** महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, 1966 (ज्याचा यात यापुढे उक्त महसुल अधिनियम असा उल्लेख करण्यात आला आहे व त्या संज्ञेत संदर्भानुसार अनुज्ञेय असल्यास त्या अन्वये नियम व आदेश यांचा समावेश होतो) याचा कलम 44 अन्वये या सोबतच्या परिशिष्ट-1 मध्ये वर्णन केलेल्या आणि जागेच्या नकाशावर **"अ"** अक्षरांनी दर्शविलेला **भुमापन क्रमांक एकलहरे गांवातील ग.ट.नं.70 क्षेत्र 44200.00 चौ.मी. पैकी 16575.00 चौ.मी.** क्षेत्रफळ असलेला किंवा त्यापेक्षा थोडा कमी अधिक प्रमाणांत मापाचा असलेला भुखंडाचा (ज्यात यापुढे उक्त भुखंड असा उल्लेख करण्यात आलेला आहे) **(शैक्षणिक प्रयोजनार्थ)** साठी वापर करण्याच्या परवानगी करिता **नाशिक** च्या जिल्हाधिकाऱ्यांकडे (ज्याचा यापुढील जिल्हाधिकारी असा उल्लेख केला असुन त्या संज्ञेत या अधिकारपत्रान्वये त्यांच्या शक्तीचा वापर करण्यासाठी आणि त्यांची कर्तव्य पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी ज्यास नियुक्ती करील अशा कोणत्याही अधिका-याचा समावेश होतो) अर्ज केला आहे.

त्या अर्थी 5 जानेवारी 2017 रोजीच्या महाराष्ट्र अध्यादेश याधील 42 (क) 2 मध्ये नमुद जिल्हाधिकारी याचे कडे भरणा केल्याच्या दिनांकापासुन साठ दिवसाच्या कालावधीच्या आत ,नियमान्वये विहीत केलेल्या नमुन्यात त्याला सनद देईल. सनद देण्यात आल्यावर, उपरोक्त प्रमाणे भरणा केल्याच्या दिनांकापासुन, अकृषिक वापरात रुपांतरण करण्यात आले असल्याचे दर्शविणारी आवश्यक ती नोंद अधिकाराभिलेखात करण्यात येईल.

त्या अर्थी असे प्रमाणित करण्यात आहे की, उक्त अधिनियमाच्या उपबंधास अधिन राहुन आणि पुढील शर्तीवर उक्त **भुमापन क्रमांक एकलहरे** गांवातील **ग.ट.नं.70 क्षेत्र 44200.00 चौ.मी. पैकी 16575.00 चौ.मी.(शैक्षणिक प्रयोजनार्थ)** वापरण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

1. **जमिन समतोल करणे व ती साफ करणे:-** ज्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. त्या विशिष्ट अकृषिक प्रयोजनास योग्य होण्यासाठी आणि आरोग्य विघातक परिस्थितीत प्रतिबंध होण्यासाठी जमिन पुरेशी समतोल करण्यास व साफ करण्यास अर्जदार बांधलेला असेल.

2.**आकारणी :-** उक्त भुखंडाच्या बाबतीत यापुर्वी बसविण्यात येणा-या आकारणीच्या ऐवजी अर्जदार दि. 31 जुले रोजी समाप्त होणारे हमी मुदतीमध्ये प्रत्येक वर्षासाठी 0.10/-पै. आकारणी देईल आणि ती मुदतसंपल्या नंतर जिल्हाधिका-याकडुन उक्त अधिनियमान्वये वेळोवेळी निश्चित करण्यात येईल अशी सुधारित आकारणी देईल.(2-अ) कलम 47-अ अन्वये बसविण्यात यावयाची रुपांतरण करण्याची रक्कम परवानगी मंजुर केल्यानंतर वीस दिवसांच्या आंत भरील.

3.**वापर :-** अर्जदार **(शैक्षणिक प्रयोजनार्थ)** (ज्या प्रयोजनासाठी परवानगी देण्यात आली असेल ते विशिष्ट प्रयोजन येथे लिहावे) या व्यतिरिक्त असलेले कोणतेही प्रयोजनासाठी जमिनीचा आणि त्यावर उभारलेले किंवा उभारावयाच्या इमारतींच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या पुर्व मंजुरीशिवाय वापर करता कामा नये.अर्जदाराने या सोबतच्या परिशिष्ट 2मध्ये असलेल्या शर्तीचे यथोचितरित्यापालन केले पाहिजे.

4.**बांधकामाबाबतची कालमर्यादा :-** अर्जदाराने या अधिकारपत्राच्या तारखेपासुन तीन वर्षाचे आत उक्त भुखंडावर भरीव व कायम स्वरुपीचे **बांधकाम** सुरु केले पाहिजे. त्याने तसे न केल्यास जिल्हाधिकाऱ्याकडून वेळोवेळी मुदत वाढविण्यात्त आलेली नसेल तर देण्यात आलेली परवानगी व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल.

5.**पट्टी देण्याबाबत दायित्व:-** अर्जदाराने उक्त जमिनीचे आकारण्याजोगे सर्व करपट्ट्या आणि उपकर दिले पाहिजे.

---

6.**शास्तीविषयीचा भुखंड :-** (अ) अर्जदाराने पुर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये अर्जदार ज्या शिक्षेस पात्र होईल असा करार इतर कोणत्याही शिक्षेस बाधा न आणता जिल्हाधिका-यास तो निर्देशित

करील अशी आकारणी फी रक्कम व उक्त अधिनियमाचे कलम 329 चे पोट कलम (2) ला अधिन राहुन तो निर्देशित करील असा दंड भरल्यावर उक्त भुखंड अर्जदाराच्या ताब्यात ठेवण्याचे चालु ठेवता येईल.

(ब) उप-बंध (अ) मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी या अधिकारपत्राच्या उपबंधाविरुध्द कोणतीही इमारत किंवा बांधकाम उभारण्यात आल्यास किंवा वापरण्यात आल्यास जिल्हाधिका-याने विनिर्दीष्ट केलेल्या मुदतीत ते काढुन टाकण्याबाबत किंवा त्यात बदल करण्याबाबत जिल्हाधिका-याने निर्देश देणे वैध असेल आणि विनिर्दीष्ट मुदतीत अशाप्रमाणे इमारत किंवा बांधकाम काढुन टाकण्यात आले नाही किंवा त्यात बदल करता येईल आणि त्याबाबतचा खर्च अर्जदाराकडुन जमिन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुल करता येईल.

**7.अधिनियमाचे उप-बंध लागू असणे :-** यात उप-बंधीत केले असेल त्या व्यतिरीक्त हे अधिकारपत्र उक्त अधिनियमाच्या आणि त्याखालील नियमांच्या उपबंधास अधिन राहील.

**परिशिष्ट-1**

| लांबी व रुंदी | | पृष्ठभागाचे एकुण क्षेत्रफळ | सीमा | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| उ-द | पु-प | | उ-द | पु-प | |
| | | 44200.00 चौ.मी. पैकी 16575.00 चौ.मी | | | |

**परिशिष्ट-2**

1. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 अन्वये नियोजन प्राधिका-याने मान्यता दिलेल्या आराखडयास अनुसरुन अर्जदाराने भुखंडावर बांधकाम केले पाहीजे.

2.अर्जदाराने इमारतीच्या प्रमाणाचे आणि नियंत्रण रेषाचे पालन केले पाहीजे. आणि मंजुर नकाशाप्रमाणे चिन्हांकित केलेले क्षेत्र मोकळी जागा म्हणुन ठेवले पाहिजे.

3. हे अधिकार पत्र पुढील विशेष शर्तीस अधिन राहील :- **मा.तहसिल कार्यालय नाशिक यांचेकडील नोटीस क्र.जमा-1/42-क/एस.आर./34/2021 नाशिक दि.15/12/2021 अन्वये पारीत केलेल्या आदेशातील नमुद अटी व शर्तीना अधिन राहुन तसेच नियोजन प्राधिकरण यांचे अंतीम अभिन्यास /बांधकाम मंजुरी प्राप्त करुन घेवुनच बिनशेती वापर करण्याच्या अटी/ शर्तीवर सदरची सनद देण्यात येत आहे.**

4. अर्जदार यांनी सादर केलेली कोणतीही माहीती अथवा कागदपत्रे ही चुकीची /दिशाभुल करणारी आढळल्यास प्रस्तुत सनद रदद समजणेत येईल.

या गोष्टीची साक्ष म्हणुन **नाशिक** च्या तहसिलदार नाशिक यांनी जिल्हाधिकारी नाशिक करिता महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आहे. आणि आपल्या पदाची मोहोर लावली आहे. आणि अर्जदाराने सुध्दा यावर दिनांक ----/-----/2021 रोजी आपली सही केली आहे.

(साक्षीदाराचे सहया व पदनामे)

1.नांव :- प्रसाद सुनील रंगनाथ सही : ------------ अर्जदाराची सही ------------------------

2.नांव :- श्यामराव सोमनाथ वराडे सही : ------------

आम्ही असे जाहीर करतो की, जिने या सनदेवर सही केली आहे. ती व्यक्ती आमच्या वैयक्तीक माहीती प्रमाणे ती जी व्यक्ती असल्याचे म्हणत आहे तीच व्यक्ती आहे आणि तीने आमच्या समक्ष आपली सही केली आहे.

तहसिलदार नाशिक

**प्रत :- मातोश्री एज्युकेशन सोसायटी तर्फे अध्यक्ष श्री.किशोर भिकाजी दराडे मु.पो. एकलहरे,ता.जि.नाशिक**

**प्रत :- तलाठी एकलहरे यांचेकडे आवश्यक त्यापुढील कार्यवाही साठी रवाना.**